# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन सूचना क्र. ४८/२०१७

क्र.संगाबाअवि/१/१०३/२-१२६०/२०१७ दिनांक - ०७ डिसेंबर, २०१७

**विषय - करिअर ॲडव्हांसमेंट योजनेअंतर्गत पदोन्नतीसाठी विद्यापीठ शिक्षकांचे अर्ज मागविण्याबाबत ...**

संदर्भ - १. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.६३/२०१०, दिनांक २०/१०/२०१०
२. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.४२/२०११, दिनांक १२/१०/२०११
३. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.२१/२०१३, दिनांक ०९/१०/२०१३
४. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र. ६/२०१७, दिनांक १९ /६/२०१७
५. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र. ८/२०१७, दिनांक २२/६/२०१७
६. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.३५/२०१७, दिनांक ७/९/२०१७

याद्वारे सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने विनियम दि. ३० जून, २०१० ला दुसरी, तीसरी व चौथी सुधारणा निर्गमित केली व शासनाने वि.अ.आयोगाच्या सुधारणा अनुक्रमे शा.नि.क्र. संकिर्ण २०१६ प्र.क्र.८८/१६/विशि-१, दि. १५.१०.२०१६ आणि शा.नि.क्र. संकिर्ण २०१७ प्र.क्र.३३/१७/विशि-१, दि. ०४.०३.२०१७ अन्वये सदर सुधारणा राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांना लागू केल्या तसेच अ.भा.तंत्रशिक्षण परिषदेने सुध्दा दि.५ मार्च २०१० च्या विनियमास प्रथम सुधारणा निर्गमित केल्या आहेत उपरोक्त संदर्भ क्र.४,५ व ६ अन्वये विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक, सहाय्यक ग्रंथपाल, उपग्रंथपाल सहा.संचालक, शारीरिक शिक्षण व उपसंचालक, शारीरिक शिक्षण यांचेकरिता करिअर ॲडव्हांसमेंट स्कीम अंतर्गत सादर करावयाच्या अर्जाची **सुधारीत पध्दती आणि अनुषंगीक सुधारीत अर्जाचे नमुने** विहित करण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भांकित निदेश विद्यापीठाच्या संकेत स्थळावर University Publications Gazzette Part I किंवा Directions या लिंकवर उपलब्ध असून त्यानुसार पात्रताधारक शिक्षकांनी आपले अर्ज विभाग प्रमुखांमार्फत त्यांच्या शिफारसीसह आस्थापना विभागाकडे **निदेश क्र.४२/२०११ मध्ये विहीत करण्यात आलेल्या मुदतीनुसार सादर करावेत. त्यासाठी निदेश क्र.४२/२०११ च्या परिच्छेद ६.०.० च्या उप-परिच्छेद ६.०.१ ते ६.७.५, आणि निदेश क्र. २१/२०१३ च्या २.११ ते २.१६ मधील तरतुदींचे अवलोकन करावे.**

***ज्या शिक्षकांनी यापूर्वी आवेदनपत्रे सादर केली असतील, त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग व तंत्रशिक्षण परिषदेच्या नविन सुधारीत निकषांची पूर्तता होत असल्यास पुन्हा नव्याने आवेदन पत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही, मात्र त्याची शहानिशा करण्याची जबाबदारी संबंधीत शिक्षकांची राहील, याबाबतीत व्यक्तिशः पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.***

### अर्ज सादर करण्याच्या पद्धतीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. **संबंधीत शिक्षकांनी स्टेज-२ ते स्टेज-५ पर्यंतच्या पदोन्नतीसाठी विहीत केलेल्या आवेदनपत्र व एपीआय प्रपत्राच्या केवळ तीन प्रती संपूर्ण सहपत्रांसह सादर करावयाच्या आहे . मात्र वरिष्ठ प्राध्यापक-स्टेज-६ साठी अर्ज करणाऱ्या यु.जी.सी. नियंत्रीत विभागातील शिक्षकांनी निदेश क्र. ४२/२०११ च्या परिच्छेद ६.४.१० आणि ए.आय.सी.टी.इ. नियंत्रीत विभागातील शिक्षकांनी निदेश क्र. २१/२०१३ च्या टेबल III च्या अ.क्र.५ आणि निदेश क्र. ८/२०१७ च्या अ.क्र. ३२ नुसार विहित करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता व नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करावी. तसेच मुळ आवेदनपत्र आणि एपीआय गुणांकन प्रपत्राच्या एकूण पाच प्रती विहीत अर्हता व संशोधन प्रकाशनांच्या पुराव्यासह तज्ञांद्वारे मूल्यांकनासाठी सादर कराव्यात.**

२. विद्यापीठात रूजू होण्यापूर्वीच्या सेवा विचारात घेण्या ज्या शिक्षकांच्या पूर्वीच्या सेवा संरक्षित करण्याबाबतचे कार्यालयीन आदेश निर्गमित झाले असतील अशा संबंधीत शिक्षकांनी कार्यालयीन आदेशाची प्रत सोबत जोडावी व निदेश क्र.४२/२०११ च्या परिच्छेद १० नुसार आपली पात्रता तपासून अर्ज सादर करावेत. तसेच अर्जासोबत पूर्वीच्या नियोक्त्यांकडून परिच्छेद १०.१ मधील a) ते f) संदर्भात प्रमाणपत्र मागवून ते अर्जासोबत जोडावे.

३. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व्यतिरिक्त इतर विद्यापीठाच्या आचार्य पदवी (Ph.D.) धारकांनी त्यांची आचार्य पदवी (Ph.D.) विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार Enrollment, Course Work and Evaluation सह पूर्ण केली असल्याबाबतचे संबंधीत विद्यापीठाचे प्रमाणपत्र / अधिसूचना प्रत अर्जासोबत जोडावे.

४. या योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी निदेश क्र.४२/२०११ च्या पृष्ठ क्र.४०० वरील Explanatory note for tables II(a) and II(b) **अ.क्र. ५** चे अवलोकन करावे. तसेच निदेश क्र. ६/२०१७ च्या

Appendix-III च्या Table-II (A) नुसार Minimum Academic Performance Requirement पूर्ण करीत असल्यासच अर्ज सादर करावेत. किंवा सदर निकषांची पूर्तता होईल त्यादिवशी अर्ज सादर करावेत. कॅटेगरी I, II व III साठी स्वतंत्रपणे **वर्षनिहाय गुणांकन सादर करावे**. (मुल्यांकन कालावधीचे एकत्रीत गुणांकन व सहपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही। वर्षाची परिगणना करतांना नियुक्ती/पुर्वीच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष याप्रमाणे करण्यात यावी. यासाठी शैक्षणिक सत्र किंवा कॅलेंडर वर्ष विचारात घेऊ नये. पुर्वीच्या पदोन्नतीची तारीख सहसंचालक/उच्चशिक्षण संचालक, यांनी मान्यता दिल्याप्रमाणे राहील. API प्रपत्रात नमुद केलेले गुणांकन तपासण्यासाठी दरवर्षीच्या API प्रपत्रानुसार पुराव्यादाखल जोडावयाची **सुस्पष्ट** सहपत्रे त्या-त्या वर्षीच्या प्रपत्राखालीच अनुक्रमाने जोडावीत.

५. **(अ) सहयोगी प्राध्यापक - स्टेज-४ साठी अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी मुळ अर्जाव्यतिरिक्त त्यांच्या Bio-data व त्याखाली 'विहीत कालावधीत' प्रकाशित झालेली फक्त प्रमुख तीन संशोधन प्रकाशने असे चार सेटस मुल्यांकनासाठी विषय तज्ञांकडे पाठविण्याकरिता स्वतंत्रपणे (मुळ अर्जाशिवाय) सादर करावेत.**

**(ब) प्राध्यापक - स्टेज-५ साठी अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी त्यांच्या Bio-data(Short) व त्याखाली 'विहीत कालावधीत' प्रकाशित झालेली फक्त पाच प्रमुख संशोधन प्रकाशने असे चार सेटस मुल्यांकन विषयतज्ज्ञांकडे पाठविण्याकरिता अर्जाशिवाय स्वतंत्रपणे सादर करावेत.**

**उपरोक्त ३/५ संशोधन प्रकाशनांची यादी खालील नमुन्यात तयार करून प्रत्येक संचासोबत एक प्र जोडावी. या सेटसमध्ये अतिरिक्त प्रकाशने, सहपत्रे किंवा प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY**

EVALUATION SCORE SHEET FOR THE ASSESSMENT OF QUALITY OF RESEARCH PUBLICATIONS OF THE CANDIDATE FOR APPOINTMENT / PROMOTION TO THE POST OF ASSOCIATE PROFESSOR/ PROFESSOR

Name of the Candidate - ------------------------------
Subject - ------------------------------
Applied for the post of - ------------------------------

| Sr. No. | Title of the publication | Date / Year of acceptance or publication | Evaluation Score | |
|---|---|---|---|---|
| | | | Out of points | Points obtained |
| | | | 10 | |

Place:
Date :
(To be written by Subject Expert) (Sign. & Seal of the Sub.Expert)

६. अर्जासोबत अनावश्यक कागदपत्रे, लेख, अवांतर लेखन, संशोधन प्रकाशने, फोटो, प्रमाणपत्रे, कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रीका, वर्तमानपत्रातील बातम्या, कात्रणे इ. जोडू नयेत.

७. **अर्ज व त्यासोबतची सर्व सहपत्रे Legal किंवा A-4 यापैकी एकाच आकाराच्या कागदावर असावीत. अर्जाची प्रत्येक प्रत स्वतंत्र कार्यालयीन फाईलमध्येच पंचिंग मशीनद्वारे पंच करून सादर करावी. स्पायरल बाईंडींग, पुस्तकासारखे बाईंडींग किंवा स्टॅपल्स लावू नयेत, अशी आवेदनपत्रे परत करण्यात येतील.**

८. विभागप्रमुखांनी सदर कार्यालयीन सूचना आपल्या अधिनस्थ सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी, ही विनंती.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीस्तव -**

१) विभाग प्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) प्रभारी संचालक, मानव संसाधन विकास केन्द्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) आस्थापना टेबल क्र.१०१ आणि १०४, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४) मा.कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
५) मा.प्र-कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
६) कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

स्वा/-
उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.